bluebytes
news that matters

Friday, July 16, 2010

**Movies and TV influence use of tobacco in India**

Publication: Arthniti, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 12, Location: Bottom-Left, Width(cms): 8, Height(cms): 16, Size(sq.cms): 128

## चित्रपटांमुळे तंबाखूंचे व्यसनी वाढतायतं...

चित्रपट तसेच टीव्ही चॅनेल्सवरील विविध कार्यक्रमांमुळे तंबाखूचे सेवन करणाऱ्यांची संख्या वाढत असून ही चिंताजनक बाब असल्याची माहिती हिलिस सेक्सारियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात देण्यात आली.

यावेळी संस्थेचे संचालक डॉ. प्रकाश गुप्ता यांनी सांगितले की, तंबाखू सेवन करण्यामध्ये भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात १.५ दशलक्ष इतके व्यसनी निर्माण होण्याच्या मार्गावर असून ही अत्यंत चिंतेची बाब आहे. त्यांना वेळीच रोखणे हे अत्यंत महत्त्वाचे असून सामाजिक कर्तव्याच्या भावनेतून हे कार्य केले गेले पाहिजे.

सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्या पद्मिनी सोमाणी यावेळी उपस्थित होत्या. त्यांनी सांगितले की, कलाकार जेव्हा पडद्यावर तंबाखू म्हणजे सिगारेट अथवा तत्सम पदार्थाचे सेवन करतो, अशावेळी त्याच्याकडे आपण कौतुकाने बघतो. नेमके हेच कारण तंबाखूचे व्यसन वाढवण्यास कारणीभूत ठरत असतात. आपण त्याच्याकडे कानाडोळा करता कामा नये, याबाबत आपापल्या स्तरावर योग्य त्या प्रकारे आवाज उठवला पाहिजे. त्याचा निषेध केला पाहिजे तरच या गोष्टी टाळता येऊ शकतील.

भारतातील सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्य व्हावे, यासाठी १ ऑगस्ट २००४ रोजी हिलिस सेक्सारियाची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या वतीने जागतिक स्तरावरील परिषदांचेही आयोजन करण्यात आले आहे.